**<u>फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन</u>**

**<u>भाषा मराठीत पुरावा</u>**

**<u>अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०५ ची शपथेवर साक्ष</u>**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः भास्कर गणपत मेंगाळ,

वयः४३ वर्षे, व्यवसायः नोकरी, पो.ह.ब.क्र.११०४,

राहणारः नागोठणे, ता.रोहा, जि.रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :</u>**

०१. घटना दि.०१/०७/२०१९ रोजी घडली. त्यावेळी पोलीस कर्मचारी श्री.परेश मोरे पोलीस स्टेशन, नागोठणे येथे ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत होते. त्यावेळी त्यांचेकडे साक्षीदार मनोज काशिनाथ जाधव यांनी अपघाताचे अनुशंगाने खबर दिली होती. श्री.परेश मोरे यांनी सदरील खबरेवरून मोटार अपघातची नोंद केली. त्यांनी त्याची चौकशी करून चौकशी अंती फिर्याद दिली. त्यावरून आरोपी विरूद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली. सदर गुन्ह्याचा तपास वरिष्ठांनी माझेकडे सोपविला.

०२. गुन्ह्याचा तपास माझेकडे आल्यानंतर मी कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यानंतर दि.०१/०७/२०१९ रोजी रात्री ०७.३० वा. चे दरम्यान मयत अनंत नारायण जाधव वाकण येथून आमडोशी येथे पायी चालत जात असताना त्यावेळी आरोपी त्याची मोटार सायकल नोंदणी क्र.एम एच–०६/बी वाय –९१४२ ने वाकण ते आमडोशी जात होता. त्यावेळी आरोपीने वाकण आमडोशी रस्त्यावरील फणसाचा माळ या ठिकाणी पादचारी अनंत नारायण जाधव याला

त्याचे मोटार सायकलने ठोकर दिली. त्यावेळी मागून येणाऱ्या मोटार सायकलवरील दोन इमस नामे दळवी व भिसे हे अपघातस्थळी थांबवले आरोपीने त्यांना घडलेली हकिकत सांगितली. त्याचप्रमाणे मागाहून तेथे आलेला इसम तेलंगे याने मयत पादचारी अनंत नारायण जाधव हा त्याचे गावातील असल्यामुळे त्याला ओळखले. अपघाताचे अनुशंगाने तो जखमीचे नातेवाईकांना सांगायला गेला. त्या ठिकाणी निलेश यादव याने त्याचे स्कॉर्पिओ गाडीमध्ये महेश अंनत जाधव याला वैद्यकीय उपचाराकरीता कोकणे हॉस्पिटल नागोठणे येथे नेले. तेथे त्याचेवर प्राथमिक उपचार करण्यात आले. पुढील उपचाराकरीता त्याला त्याच स्कॉर्पिओ गाडीमधून एम.जी.एम.हॉस्पिटल कामोठे मुंबई येथे नेले. सदर ठिकाणी मयतावर ३–४ महिने वैद्यकीय उपचार करण्यात आले. त्या दरम्यान तो शुद्धीवर नव्हता. तेथे त्याचे निदान न झाल्यामुळे डॉक्टरांनी आवश्यक वैद्यकीय उपचार सांगून मयाताला त्याचे घरी पाठविले. त्यानंतर त्याने काही दिवस घरी उपचार घेतल्यानंतर दि.२१.०१.२०२० रोजी त्याला वैद्यकीय उपचारा करीता शासकीय रूग्णालय, नागोठणे येथे भरती करण्यात आले. तेथे उपचारादरम्यान त्याच दिवशी त्याचा मृत्यू झाला. पुढे त्याचे प्रेताचा इन्क्वेस्ट पंचनामा व शवविच्छेदन करण्यात आले. त्या संबंधी आवश्यक दस्तऐवज मी मिळविले.

०३. गुन्ह्याचा तपास मला प्राप्त झाला त्यावेळी साक्षीदारांनी दिलेली खबर, श्री.परेश मोरे यांनी नोंदविलेला पंचनामा व फिर्याद हे दस्त मिळाले होते. गुन्ह्याचे तपासादरम्यान मी सात साक्षीदारांची बयाणे नोंदविली. संबंधीत आर.टी.ओ.यांचेकडून मी अपघातातील नमूद मोटार सायकलची तपासणी करून घेतली. त्या संबंधी अहवाल मिळविला. मयत अनंत जाधव याचा मृत्यू झाल्यामुळे

भा.द.वि.कल. ३०४(अ) वाढीव कलम लावल्याबाबत न्यायालयाला पत्र पाठविले. दि.१८/०३/२०२० रोजीचे पत्रावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात येतो. त्या अनुशंगाने मी साक्षीदारांची पुरवणी बयाणे नोंदविली. आवश्यक दस्तऐवज प्राप्त करून पुरवणी दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

०४. गुन्ह्याचे तपासाअंती आरोपीने त्याचे ताब्यातील नमूद मोटारसायकल वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे चालवून पादचारी अनंत नारायण जाधव याला मागून धडक दिली, त्यामुळे त्याला गंभीर दुखापती होवून पुढे त्याचा मृत्यू झाला या बाबी आढळल्या. तपासाअंती सबळ पुरावा प्राप्त झाल्यामुळे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. (अभिलेखाची पहाणी केली असता अनावधनाने माझे वि.पुर्वाधिकारी यांचे पुरवणी दोषारोपपत्राकडे लक्ष न गेल्यामुळे आरोपी विरूद्ध भा.द.वि.कलम २७९ व ३३८ आणि मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अंतर्गत फक्त दोषारोप निश्चित करण्यात आल्याचे दिसून पडते. प्रस्तूत साक्षीदाराने दिलेलीसाक्ष व अभिलेखावर उपलब्ध पुरवणी दोषारोपपत्र विचारात घेता दोषारोपामध्ये बदल करणे गरजेचे असल्यामुळे साक्षीदाराची उलटतपासणी पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येते.)

सरतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत,

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.२९.०५.२०२३. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

**उलटतपासणी आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर.बी. सावंत यांच्यामार्फत पुढे सुरु.**

०५. हे म्हणणे खरे आहे की, वाकण ते आमडोशी रस्त्यावर कारखान्यामध्ये येणा–या जाणा–या वाहनांची वर्दळ असते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदर रस्त्यावर वाहनांची कमी वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, वाकण ते आमडोशी रस्त्याचे दोन्ही बाजूला ०३ फुटाची साईडपट्टी आहे, कथीत अपघातस्थळ सदर रस्त्यावरील डांबरी भागावर आहे. साक्षीदार पुन्हा सांगातो की, अपघातस्थळ सदर रस्त्याचे साईड पट्टीवर आहे.

०६. मी तपास अधिकारी म्हणून घटनास्थळ बघीतले आहे. मी घटनास्थळ पंचनामा स्वतःहून वाचून बघीतला आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्याप्रमाणे अपघातस्थळ पक्क्या रोडवर असल्याचे दिसते. हे म्हणणे खरे आहे की, मयत अनंत नारायण जाधव अपघातानंतर ३–४ महिन्यांनी मृत्यू पावला. हे म्हणणे खरे आहे की, अनंत जाधव याने तीन महिने दवाखान्यात उपचार घेतले, त्यानंतर काही काळ त्याने त्याचे घरी उपचार घेतले व नंतर त्याचा उपचारादरम्यान दवाखान्यामध्ये मृत्यू झाला. हे म्हणणे खरे आहे की, मी गुन्हयाचे तपासादरम्यान अनंत जाधव याचे मृत्यू पुर्वी त्याचे बयाण नोंदविले नाही. साक्षीदार स्वतःहू सांगतो की, तो अनंत जाधव दवाखान्यामध्ये वैद्यकिय उपचार घेत असताना १–२ वेळा दवाखान्यामध्ये गेला असता बेशुद्ध होता, त्या अनुषंगाने डॉक्टरांनी लेखी प्रमाणपत्र दिले आहे.

०७. हे म्हणणे खरे आहे की, कथीत अपघातानंतर मयत अनंत जाधव याचेवर शस्त्रक्रिया झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा मृत्यू त्याचे डोक्याला शस्त्रक्रिये नंतर सेफ्टीक झाल्यामुळे मृत्यू झाला होता.

०८. हे म्हणणे खरे आहे की, सर्व साक्षीदार स्थानिक रहिवाशी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी विलंबाने साक्षीदारांची बयाणे नोंदविली.

०९. हे म्हणणे खरे नाही की, गुन्ह्याचे तपासाअंती आरोपीने त्याचे ताब्यातील नमूद मोटारसायकल वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे चालवून पादचारी अनंत नारायण जाधव याला मागून धडक दिली, त्यामुळे त्याला गंभीर दुखापती होवून पुढे त्याचा मृत्यू झाला या बाबी आढळल्या नव्हत्या.

१०. हे म्हणणे खरे नाही की, मयत अनंत जाधव मृत्यू पुर्वी बयाण देण्याकरीता वैद्यकिय दृष्या सक्षम होता, मी साक्षीदारांची बयाणे माझे मताप्रमाणे नोंदविली, मी कथीत गुन्हयाचा चुकिचा तपास करुन चुकिचे दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले, मी सरतपासणीमध्ये खोटी साक्ष दिली.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.04.15 18:22:27 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.१५.०४.२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.